पोलीस अधीक्षक, पालघर यांचे कार्यालय

मध्यवती प्रशासकीय इमारत संकुल, मोरेकुरण रोड, पालघर बोईसर रोड,
कोळगाव जिल्हा- पालघर. दुरध्वनी -०२५२५-२५११००
E-mail sp.palghar@mahapolice.gov.in



जा. क्र.पोअपा/आस्था-१/पोशि, चापोशि ते सहा. पोउनि/अंतिम/सेवाज्येष्ठता यादी प्रसिध्द /83 /२०२६,दि. 20/०३/२०२६

संदर्भ :- या कायालयाकडील जा. क्र. पोअपा/आस्था-१/पो.शि. ते सहा. पोउनि/तात्पुरती सेवाज्येष्ठता यादी प्रसिध्द/२४/२०२६, दि. २९/०१/२०२६

विषय :- पोलीस शिपाई व चालक पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक या संवर्गातील अंतिम सेवाज्येष्ठता यादी प्रसिध्द करणेबाबत.

---ooo---

पालघर जिल्हा पोलीस घटकाचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई/चालक पोलीस शिपाई/पोलीस नाईक/पोलीस हवालदार/सहायक पोलीस उपनिरीक्षक यांची सन-२०२६ ची तात्पुरती सेवाज्येष्ठता यादी महाराष्ट्र शासन राजपत्रक असाधारण भाग चार -ब जुन २२,२०२१/आषाढ १. शके १९४३, दि.२१/०६/२०२१ नुसार प्रत्येक नियुक्ती दिनांक तसेच पदोन्नती ज्येष्ठतेचा दिनांकानुसार तयार करुन, पोलीस अधीक्षक, पालघर www.palgharpolice.gov.in या वेबसाईटवर उपरोक्त संदर्भान्वये दि.२९.०१.२०२६ रोजी प्रसिध्द करण्यांत आलेल्या होत्या. सदर सेवाज्येष्ठता यादया वेबसाईट वरुन डाऊनलोड करुन, पोलीस ठाणेच्या नोटीस बोर्डावर लावुन सर्व अंमलदारांच्या स्थान निश्चितीबाबत निदर्शनास आणुन देणेबाबत तसेच हजेरीवर ०५ दिवस वाचून दाखविणेबाबत कळविण्यांत आलेले होते. तसेच सदर सेवाज्येष्ठता यादीमध्ये नियुक्ती मार्ग/जन्म दिनांक/ जात प्रवर्ग/प्रत्येक रुजू दिनांक/पदोन्नती दिनांक/सेवाज्येष्ठता दिनांक/सेवानिवृत्ती दिनांक/ स्थान निश्चितीबाबत/ शैक्षणिक अर्हता इत्यादी बाबत कुणाच्या काही आक्षेप असल्यास ते दि.१२.०२.२०२६ रोजी पावेतो पाठविणेबाबत सर्व विभागीय पोलीस उप अधिकारी/प्रभारी अधिकारी, पोलीस ठाणे/सर्व शाखा प्रभारी अधिकारी/राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, पालघर यांना त्यांचे मार्फतीने सर्व संबंधित पोलीस अंमलदार यांना कळविण्यांत आलेले होते.

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, परिपत्रक क्र. पीएम-०३१४/२०३/प्र.क्र.६८/पोल-५ ब, दि.१२.०५.२०२१ व शासन शुध्दीपत्रक क्र. पीएम-०३१४/२०३/प्र.क्र.६८/पोल-५ ब, दि.२९.११.२०२२ अन्वये राज्य राखीव पोलीस बल तसेच जिल्हा पोलीस घटकात बदलुन येणा-या अंमलदारांची सेवाज्येष्ठता निश्चित करण्यासाठी त्याचा भरतीचा दिनांक ग्राह्य धरण्यांत येऊन, राज्य राखीव बदलातील बदलुन येणारा अंमलदार ज्या वर्षी राज्य राखीव पोलीस दलात भरती झाला असेल त्या वर्षात त्याच्या प्रवर्गातील अंमलदार ज्या पदावर कार्यरत आहेत. त्या वर्षातील जिल्हा पोलीस दलात भरती झालेल्या सर्व अंमलदारांच्या सर्वात शेवटी त्याची सेवाज्येष्ठता निश्चित करण्यांत आलेली आहे. त्या वर्षात त्याच्या प्रवर्गातील अंमलदार ज्या पदावर कार्यरत आहेत. त्या पदावरच तो नियुक्तीस पात्र राहिल असे निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार पालघर जिल्हा पोलीस घटकाचे आस्थापनेवरील एकही पोलीस अंमलदार यांना आक्षेप नोंदविलेला नसुन,सन-२०२६ ची अंतिम सेज्येष्ठाता यादया सर्व पोलीस अंमलदारांच्या माहिती करीता पोलीस अधीक्षक, पालघर www.palgharpolice.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येत आहे. तरी सर्व संबंधीत पोलीस अंमलदार यांनी त्याबाबतची नोंद घ्यावी.

20/3/26

(यतिश देशमुख, भा. प. से.)
पोलीस अधीक्षक, पालघर

प्रति,
सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, जिल्हा पालघर
सर्व प्रभारी अधिकारी, पोलीस ठाणे सर्व शाखा, पालघर
राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय पालघर

प्रत योग्य त्या कार्यवही करीता सादर :-
प्रभारी अधिकारी, सायबर सेल, पालघर